महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा. क्र. : तंशिविकापु/विवि-३/२०२१/ ४ee८
दिनांक : ०१/११/२०२१ 01 NOV 2021

प्रति,

प्राचार्य / संचालक,
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व तांत्रिक व्यावसायिक पदवी, पदव्युत्तर पदवी,
अभ्यासक्रमाच्या संस्था (पुणे विभाग पुणे)

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी तांत्रिक व्यावसिक अभ्यासक्रमांच्या केंद्रिभत (कॅप) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत..**

संदर्भ : १. मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.१०/एडीएम/इनटेक अप्रुव्हल/२०२१/४५२ दि.१७-०६-२०२१
२. या कार्यालयाचे पत्र क्र.तंशिविपू/विवि/इनटेक अप्रुव्हल/२०२१-२२/२५८५ दि.२१.०६.२०२१
३. या कार्यालयाचे पत्र क्र.तंशिविपू/विवि/इनटेक अप्रुव्हल/२०२१-२२/४२१० दि.२१.०९.२०२१

उपरोक्त विषयाचे संदर्भ क्र.०१ चे पत्र या कार्यालयास प्राप्त झाले असून सदर पत्राच्या अनुषंगाने, या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व तांत्रिक व्यावसायिक पदवी, पदव्युत्तर पदवी, अभ्यासक्रमाच्या संस्थाना या परिपत्रकाव्दारे सुचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ वर्षासाठी सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडून करण्यात येत असून पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी संस्थांना शिखर परिषदांची मान्यता, संचालनालयाची मान्यता, त्यानुसार संबंधित विदयापीठांकडून संलग्नीकरण प्रदान केल्याची माहिती अदयावत करुन ती पडताळणी करण्याबाबत संदर्भाधीन पत्रान्वये यापूर्वी कळविले आहे.

तसेच ज्या संस्थांनी प्रवेशक्षमता व माहिती या कार्यालयाने तपासून मंजूर केली आहे अशा संस्थांनी सदर मंजूर केलेल्या माहितीची पडताळणी करावी व शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीताची मंजूर प्रवेशक्षमता बिनचूक असल्याची खात्री करावी. मंजूर केलेल्या प्रवेशक्षमतेमध्ये दुरुस्ती असल्यास तात्काळ या कार्यालयाशी प्रत्यक्ष दूरध्वनीव्दारे ०२०-२५६५६२३४ विस्तारीत क्रमांक २०६ वर संपर्क साधून आवश्यक ती दुरुस्ती करुन घ्यावी.

आपल्या संस्थेने भरलेल्या माहितीच्या आधारे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरीता प्रवेशक्षमता निश्चित करण्यात येणार असल्याने व सदरची माहिती प्रवेशासंबंधी असल्याने माहितीची संवेदनशीलता व तातडी लक्षात घेवून प्रवेशक्षमतेबाबतची माहितीच्या अचूकतेबाबत योग्य दक्षता घेण्यात यावी. संस्थेने चुकीची माहिती भरल्यास व त्यानुसार प्रवेश प्रक्रियेमध्ये अडचणी उदभवल्यास त्यास संबंधित संस्था सर्वस्वी जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

(डॉ.द.वा.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :-प्रोग्रमर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावरती प्रदर्शित करण्याकरीता